एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८.
राज्यातील वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली अनुदान योजनेसाठी मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक: धोरण-२०२३/प्र.क्र.८१/टेक्स- ५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २८ ऑगस्ट, २०२४

**वाचा:-**

१. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. धोरण-२०२३/प्र.क्र.८१/टेक्स -५, दि.०२ जून, २०२३.
२. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. धोरण-२०२३/प्र.क्र.८१-अ/टेक्स -५, दि.१२ डिसेंबर, २०२३.
३. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. धोरण-२०२३/प्र.क्र.८१-अ/टेक्स -५, दि.०६ मार्च, २०२४.

**प्रस्तावना:-**

संदर्भ क्र.१ येथील दि.०२ जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्याचे नवीन एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ जाहीर करण्यात आले आहे. सदर धोरणान्वये राज्यातील विविध वस्त्रोद्योग घटकांना भांडवली अनुदान देण्याच्या योजना जाहीर करण्यात आलेल्या आहेत. तसेच संदर्भ क्र.२ व ३ येथील शासन निर्णयान्वये सदर धोरणामध्ये काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. राज्यातील वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली अनुदान योजनेबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**शासन निर्णय:-**

राज्याचे नवीन एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अंतर्गत, राज्यातील वस्त्रोद्योग प्रकल्पांना त्यांचे वस्त्रोद्योग प्रक्रीया घटक, प्रकल्पाचे ठिकाण, उद्योजकांचा प्रवर्ग (अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/अल्पसंख्याक/माजी सैनिक/महिला) इत्यादी बाबी विचारात घेवून या वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली अनुदान वितरीत करण्याच्या योजनेसाठी खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना विहित करण्यात येत आहेत.

२. या योजनेचा कालावधी दि.०२ जून, २०२३ ते दि.३१ मार्च, २०२८ असा असेल. जर पुढील नवीन धोरण दि.३१ मार्च, २०२८ पर्यंत तयार केले गेले नाही तर हे धोरण पुढील कमाल १ वर्षाच्या कालावधीसाठी कार्यान्वित राहील. या धोरणाच्या कालावधीत केंद्र शासन पुरस्कृत A-TUFS/RR-TUFS योजनेच्या निकषाप्रमाणे असलेल्या यंत्रसामुग्री अथवा राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील अशा यंत्रसामुग्री भांडवली अनुदानासाठी पात्र असतील. पात्र यंत्रसामुग्री मध्ये फक्त नवीन यांत्रसामुग्रीचा समावेश करण्यात येईल, यामध्ये जुनी किंवा नुतनीकरण केलेली यंत्रसामुग्री ग्राह्य धरली जाणार नाही.

३. खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे झोनच्या आधारे जिनिंग आणि प्रेसिंग, सूतगिरण्या, यंत्रमाग, प्रोसेसिंग क्षेत्र, निटिंग, होजिअरी, गार्मेंटिंग क्षेत्र, अपारंपारिक सूत/धागा आणि सिंथेटिक सूत/धागा आणि टेक्निकल टेक्सटाईल या सर्व वस्त्रोद्योग प्रकल्पांच्या स्थिर भांडवली गुंतवणुकीवर (पात्र संयंत्र व यंत्रसामुग्रीच्या एकूण मूळ किंमतीवर) भांडवली अनुदान देय राहील. त्याअंतर्गत पात्र यंत्रसामुग्रीच्या

खरेदीसाठी घेतलेले दीर्घ मुदती कर्ज व अंशत: स्व-अर्थसहाय्य तसेच पूर्णत: स्व-अर्थसहाय्य या बाबींद्वारे खर्च झालेल्या रकमेवर भांडवली अनुदान देय राहील.

| अ.क्र. | आकार/ झोन | भांडवली अनुदान स्वरूपात वित्तीय सहाय्य (स्थिर भांडवली गुंतवणुकीवर) |
|---|---|---|
| सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योग (एमएसएमई) | | |
| १ | झोन १ | ४५% |
| २ | झोन २ | ४०% |
| ३ | झोन ३ | ३५% |
| ४ | झोन ४ | ३०% |
| मोठे उद्योग | | |
| १ | झोन १ | ४०% |
| २ | झोन २ | ३५% |
| ३ | झोन ३ | ३०% |
| ४ | झोन ४ | २५% |
| विशाल (Mega) उद्योग | | |
| १ | झोन १ | ५५% किंवा जास्तीत जास्त रु. २५० कोटी यापैकी जे कमी असेल इतकी रक्कम |
| २ | झोन २ | ५०% किंवा जास्तीत जास्त रु. २२५ कोटी यापैकी जे कमी असेल इतकी रक्कम |
| ३ | झोन ३ | ४५% किंवा जास्तीत जास्त रु. २०० कोटी यापैकी जे कमी असेल इतकी रक्कम |
| ४ | झोन ४ | ४०% किंवा जास्तीत जास्त रु. १७५ कोटी यापैकी जे कमी असेल इतकी रक्कम |
| अति विशाल (Ultra Mega) उद्योग | | |
| | | उद्योग विभागाच्या अखत्यारीतील मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समिती (HPC) मार्फत अति विशाल वस्त्रोद्योग प्रकल्पांना मान्यता देण्यात येईल तसेच अनुदान (Special Package of Incentives) निश्चित करण्यात येईल.<br>विभागाकडून हेतू पत्र (Letter of Intent) निर्गमीत झाल्याच्या तारखेपासून १० वर्षांच्या कालावधीत अति विशाल वस्त्रोद्योग प्रकल्पांना गुंतवणूक करावी लागेल. |

(झोननिहाय वर्गीकरण परिशिष्ट "अ" मध्ये दिलेले आहे.)

**३. वस्त्रोद्योग घटकांची नोंदणी तसेच भांडवली अनुदानासाठी पात्र प्रकल्प व अनुज्ञेय रक्कम-**

१) प्रथम वस्त्रोद्योग प्रकल्पांनी वस्त्रोद्योग विभागाच्या संकेतस्थळावर साईन-अप फॉर्म (Sign-Up Form) भरणे आवश्यक आहे. सदर साईन-अप फॉर्म परिशिष्ट "ब" मध्ये जोडले आहे. साईन-अप फॉर्म भरल्यानंतर वस्त्रोद्योग प्रकल्पाने ऑनलाईन व्यवसाय आवेदन फॉर्म (Business Application Form) भरून नोंदणी पूर्ण करणे आवश्यक आहे. सदर ऑनलाईन व्यवसाय आवेदन फॉर्म परिशिष्ट "क" मध्ये जोडले आहे. या अर्जामध्ये वस्त्रोद्योग प्रकल्प आणि त्या प्रकल्पाचे आर्थिक तपशील नमूद करण्यात यावेत. सदर अर्ज भरल्यानंतर हा अर्ज आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांच्याकडे ऑनलाईन छाननीसाठी सादर करण्यात

येईल. सदर अर्जाची छाननी आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी केल्यानंतर पात्र वस्त्रोद्योग प्रकल्पांनी नोंदणी शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. लघु, सूक्ष्म व मध्यम वस्त्रोद्योग प्रकल्पांसाठी रु.५,०००/- तर मोठे, विशाल व अतिविशाल वस्त्रोद्योग प्रकल्पांसाठी रु.१०,०००/- इतके नोंदणी शुल्क पोर्टलवर भरल्यानंतर वस्त्रोद्योग घटकांच्या नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होईल.

२) वस्त्रोद्योग प्रकल्पाने सदर नोंदणी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर ऑनलाईन प्रणालीव्दारे स्वयंचलित Textile Registration Number (TRN) उत्पन्न होईल, ज्याचा वापर भांडवली अनुदानासंदर्भातील सर्व बाबींसाठी करण्यात येईल. विद्यमान वस्त्रोद्योग प्रकल्पांनी सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एका कॅलेंडर वर्षाच्या कालावधीत Textile Registration Number (TRN) प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील.

३) सदर भांडवली अनुदान योजना ही एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ या कालावधीत उत्पादनाखाली येणाऱ्या वस्त्रोद्योग प्रकल्पांसाठी तसेच अस्तित्वातील प्रकल्पांचे विस्तारीकरण आणि विविधीकरण यांच्यासाठी अनुज्ञेय राहील. सदर भांडवली अनुदान हे प्रकल्पाच्या मशिनरी, ETP/CETP/ZLD तसेच सौर ऊर्जा संयंत्र उभारण्यासाठी अनुज्ञेय राहील.

४) बँक/वित्तीय संस्थांकडून कर्ज घेतलेले वस्त्रोद्योग प्रकल्प, अंशत: स्व-अर्थसहाय्यित किंवा पूर्णत: स्व-अर्थसहाय्यित वस्त्रोद्योग प्रकल्पांच्या स्थिर भांडवली गुंतवणुकीवर (पात्र संयंत्र व यंत्रसामुग्रीच्या एकूण मूळ किंमतीवर) उपरोक्त तक्त्यानुसार भांडवली अनुदान अनुज्ञेय राहील.

५) विद्यमान तसेच नवीन वस्त्रोद्योग प्रकल्पांना सौर ऊर्जा प्रकल्प स्थापनेसाठी सौर ऊर्जा प्रकल्प किंमतीच्या २० टक्के किंवा ४.८० कोटी रुपयांपैकी जे कमी असेल तेवढे भांडवली अनुदान दिले जाईल. याबाबत सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी निर्गमीत करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

६) विद्यमान वस्त्रोद्योग प्रकल्पांना विस्तारीकरण किंवा विविधीकरण करावयाचे असल्यास त्या प्रकल्पाने मागील वर्षाच्या तुलनेत त्याची एकूण स्थिर भांडवली गुंतवणूक २५% आणि त्याच्या एकूण उत्पादन क्षमतेत २५% वाढ करणे आवश्यक राहील. तसेच या प्रकल्पामुळे सध्याच्या प्रकल्पापेक्षा १०% अधिक रोजगार निर्मिती होणे आवश्यक राहील. सदर विस्तारिकरण किंवा विविधीकरण प्रकल्पामध्ये पुढील/मागील (Forward/Backward) प्रक्रियेचा एकत्रित समावेश असेल. तसेच विद्यमान वस्त्रोद्योग प्रकल्पांचे विस्तारीकरण किंवा विविधीकरण हे कंपोझिट युनिट असल्यास त्यांना त्यामधील प्रत्येक वस्त्रोद्योग घटकांना स्वतंत्रपणे अर्ज करण्याची मुभा राहील.

७) या योजनेंतर्गत प्रकल्पाच्या गुंतवणूकीसाठी कोणतीही कमाल मर्यादा राहणार नाही.

८) संपूर्ण धोरण कालावधीत प्रोसेसींग प्रकल्पातील ZLD साठी बांधकामावरील खर्च भांडवली अनुदानासाठी पात्र राहतील. तथापि, प्रोसेसींग प्रकल्पातील ETP/CETP साठी बांधकामावरील खर्च भांडवली अनुदानासाठी पात्र राहणार नाहीत. ZLD च्या बांधकामाच्या खर्चाच्या भांडवली अनुदानासाठी वस्त्रोद्योग प्रकल्पाने सदर बांधकामाचा खर्च हा SASMIRA या संस्थेकडून प्रमाणीत करून घेणे आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्र जोडून वस्त्रोद्योग प्रकल्पाने भांडवली अनुदानाची मागणी करावी. सदर भांडवली अनुदानासाठी पोर्टलवर स्वतंत्र फॉर्म उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर भांडवली अनुदान खालीलप्रमाणे देय असेल:-

(I) सांडपाणी प्रक्रिया केंद्र (ईटीपी) आणि संयुक्त सांडपाणी प्रक्रिया केंद्र (सीईटीपी):-

सदर प्रक्रिया केंद्राच्या उभारणीसाठी ५० टक्के भांडवली अनुदान किंवा ५ कोटी रुपयांपैकी जे कमी असेल ते राज्यातील सर्व झोनमध्ये देण्यात येईल. सदर अनुदान नवीन प्रकल्पांना लागू राहील. उद्योग विभागाच्या क्लस्टर विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर क्लस्टर्स संयुक्त सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याकरीता अनुदानास पात्र राहील.

(II) झिरो लिक्विड डिस्चार्ज (झेडएलडी) साठी सहाय्य:-

झेडएलडी प्रकल्पांच्या स्थापनेसाठी पात्र बांधकाम (Civil Infrastructure) आणि यंत्रसामुग्रीच्या किंमतीच्या ५०% (जास्तीत जास्त १० कोटी रुपयांपर्यंत) अनुदान राज्यातील सर्व झोनमध्ये देण्यात येईल. प्रकल्पाच्या एकूण खर्चात जमिनीच्या किंमतीचा समावेश असणार नाही.

९) कॉमन स्टीम जनरेशन प्लांट:-

राज्यातल्या सर्व झोन मध्ये स्टीम जनरेशन प्लांट उभारण्यासाठी ५० टक्के भांडवली अनुदान किंवा १ कोटी रुपये (यापैकी जे कमी असेल) दिले जाईल. कॉमन स्टीम जनरेशन प्लांट, केवळ टेक्सटाईल क्लस्टर्स तसेच वस्त्रोद्योग संकुलासाठी लागू राहील.

१०) पुनर्प्रक्रीया प्रकल्पांची स्थापना- शाश्वततेचा एक भाग म्हणून, जुन्या वस्त्रोद्योग उत्पादनांच्या पुनर्प्रक्रियासाठी स्थापन करण्यात येणाऱ्या नवीन प्रकल्पांना राज्य शासन ५० टक्के किंवा रु. २ कोटी यापैकी जे कमी असेल ते अनुदान देईल. राज्यातील ६ महसूल विभागांमध्ये प्रत्येकी दोन अशा जास्तीत जास्त १२ पुनर्प्रक्रिया प्रकल्पांना या धोरणांतर्गत प्रोत्साहन दिले जाईल. अशा वस्त्रोद्योग प्रकल्पांचा तपशिलवार प्रकल्प अहवाल शासनाव्दारे स्थापन करण्यात आलेल्या समितीव्दारे मंजूर करणे आवश्यक राहील. याबाबत पुनर्प्रक्रीया प्रकल्पांसाठी निर्गमीत करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

११) शासकीय भागभांडवलाचा लाभ घेणा-या उत्पादनाखालील, अंशत: उत्पादनाखालील तसेच उभारणीखालील सहकारी सूतगिरण्या/सहकारी यंत्रमाग संस्था भांडवली अनुदानास पात्र राहणार नाहीत. तथापि ज्या सहकारी सूतगिरण्या/सहकारी यंत्रमाग संस्था त्यांचा मूळ प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्यांच्याकडील देय्य शासकीय देणी शासनास परत करुन स्वबळावर विस्तारीकरण करतील त्यांना त्यांच्या विस्तारीकरणासाठी भांडवली अनुदान अनुज्ञेय राहील.

१२) भांडवली अनुदानाची एकूण रक्कम स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या (FCI) १००% पेक्षा जास्त असणार नाही. यामध्ये केंद्र शासन किंवा राज्याच्या इतर विभागांनी दिलेल्या प्रोत्साहनांचा समावेश राहील.

१३) कर्जाचे हप्ते नियमितपणे परत न करणाऱ्या वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली अनुदानासाठी प्रस्ताव दाखल करता येणार नाही. यासाठी वस्त्रोद्योग प्रकल्प एन.पी.ए. मध्ये नसल्याबाबत संबंधीत वित्तीय संस्थेचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

१४) वस्त्रोद्योग प्रकल्पाच्या मान्यताप्राप्त विस्तृत प्रकल्प अहवालापेक्षा (डीपीआर) जास्त रक्कम जर वस्त्रोद्योग प्रकल्पाने यंत्र सामुग्रीच्या खरेदीसाठी खर्च केलेली असेल तर सदर जादा रक्कम भांडवली अनुदानासाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही. तसेच मान्यताप्राप्त विस्तृत प्रकल्प अहवालामध्ये (डीपीआर) नमूद मूळ प्रकल्प किंमतीमध्ये झालेल्या वाढीवर भांडवली अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

१५) सदर भांडवली अनुदान केंद्र पुरस्कृत TUFS, उद्योग विभाग इत्यादींकडून मिळणाऱ्या सर्व सवलती व्यतिरीक्त राहतील.

१६) वस्त्रोद्योग प्रकल्पास दोन हप्त्यांमध्ये वितरीत करण्यात येणारे भांडवली अनुदान वस्त्रोद्योग प्रकल्पाने अर्जामध्ये नमूद केलेल्या बचत/चालू बँक खात्यामध्ये जमा केले जाईल. वस्त्रोद्योग प्रकल्पास सदर नमूद बचत/चालू बँक खात्यामध्ये बदल करावयाचा असल्यास सदर बदल शासनाच्या पूर्व परवानगीने करणे आवश्यक राहील.

१७) **अतिरिक्त ५% भांडवली अनुदान-**

१. महिलांद्वारे चालवल्या जाणाऱ्या ज्या वस्त्रोद्योग प्रकल्पांमध्ये त्यांच्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी ५०% पेक्षा जास्त महिलांचा समावेश आहे आणि त्या वस्त्रोद्योग प्रकल्पांमध्ये पाळणाघराची सुविधा उपलब्ध आहे. अशा वस्त्रोद्योग प्रकल्पांना अतिरिक्त ५% भांडवली अनुदान दिले जाईल.

२. अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/अल्पसंख्याक/माजी सैनिकांद्वारे चालवल्या जाणाऱ्या वस्त्रोद्योग प्रकल्पाच्या संचालक मंडळामध्ये (Board of Directors) किमान ३०% व्यक्तींचा समावेश उपरोक्त प्रवर्गामधील असलेल्या वस्त्रोद्योग प्रकल्पांस ५% अतिरिक्त भांडवली अनुदान अनुज्ञेय राहील.

(**टिप-** शासन शुध्दीपत्रक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. धोरण २०१२/ प्र.क्र.१० /टेक्स-२, दि.१५/०३/२०१२ नुसार अनुसूचीत जाती/अनुसूचीत जमाती/अल्पसंख्यांक समुदायातील व्यक्तीच्या मालकीचा खाजगी तत्वावरील प्रकल्प अनुदानासाठी पात्र असेल व सहकारी तत्वावरील प्रकल्पातील अनुसुचीत जाती/जमाती/अल्पसंख्यांक समाजाचे ८०% सभासद त्या-त्या प्रवर्गातील असणे आवश्यक आहे. (अनुसूचीत जाती/अनुसूचीत जमातीसाठी सक्षम प्राधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल ). महाराष्ट्र राज्यात राहणाऱ्या मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, झोराष्ट्रीन (पारशी) आणि जैन या लोकसमुहांना अल्पसंख्यांक लोकसमुह म्हणून घोषीत करण्यात आले आहे. अल्पसंख्यांक समाजाच्या बाबतीत संबंधित व्यक्तीच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावरील धर्म/जात याबाबतच्या नोंदी, ख्रिश्चन समाजाच्या बाबतीत बाप्टीझम प्रमाणपत्र तसेच इतर कोणताही पुरावा नसल्यास व्यक्तीने संबंधित धर्माचा असल्याबाबतचा केलेल्या शपथपत्राच्या आधारे संबंधीत व्यक्ती अल्पसंख्यांक असल्याचे ग्राह्य धरण्यात येईल.)

**४. भांडवली अनुदानाचे वितरण :-**

एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ कालावधीमध्ये वस्त्रोद्योग प्रकल्प उत्पादनाखाली आल्यानंतर त्या वस्त्रोद्योग प्रकल्पास खालीलप्रमाणे दोन हप्त्यांमध्ये भांडवली अनुदान प्रकल्पाच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.:-

१) **पहिला हप्ता**:- वस्त्रोद्योग प्रकल्प उत्पादनाखाली आल्याच्या १२ महिन्यांनंतर पात्र रकमेच्या ६०%.
२) **दुसरा हप्ता**:- वस्त्रोद्योग प्रकल्प उत्पादनाखाली येऊन प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरु झाल्याच्या २४ महिन्यांनंतर पात्र रकमेच्या ४०%.

**अनुदान वितरणाच्या अटी:-**

**(I) पहिला हप्ता:-** १) वस्त्रोद्योग प्रकल्पांना (ETP / CETP / ZLD सह) A-TUFS / RR-TUFS योजनेच्या निकषाप्रमाणे असलेल्या यंत्रसामुग्रीसाठी किंवा राज्य शासनाने निश्चित केलेल्या सयंत्र व यंत्रसामुग्रीसाठी एकूण पात्र रक्कम विचारात घेऊन पहिला हप्ता, प्रकल्प ७० टक्के व त्यापेक्षा जास्त क्षमतेने उत्पादनाखाली आल्यावर १२ महिन्यानंतर वितरीत करण्यात येईल.

२) जर संबंधित वस्त्रोद्योग प्रकल्पाने पहिल्या हप्त्यापुर्वी मान्यताप्राप्त विस्तृत प्रकल्प अहवालामध्ये (डीपीआर) नमूद केलेली गुंतवणूकीची रक्कम पुर्णपणे प्रकल्पावर खर्च केली नसेल तर, जितकी रक्कम पहिल्या हप्त्यावेळी पात्र यंत्रसामुग्रीसाठी खर्च केली आहे, ती रक्कम विचारात घेऊन भांडवली अनुदानाची पहिल्या हप्त्याची रक्कम वितरीत करण्यात येईल.

३) पहिला हप्ता वितरीत करतांना वस्त्रोद्योग प्रकल्प एन.पी.ए. मध्ये नसल्याबाबत संबंधीत वित्तीय संस्थेचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**(II) दुसरा हप्ता:-** १) भांडवली अनुदानाचा दुसरा हप्ता वितरीत करतांना असा वस्त्रोद्योग प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू होणे व पात्र यंत्रसामुग्रीकरीता पुर्ण रक्कम खर्च करणे आवश्यक असल्याचे विचारात घेउन अनुदानाचा दुसरा हप्ता वितरीत करण्यात येईल. तसेच पहिल्या वर्षात खर्च/ गुंतवणूक न झालेली परंतु आता खर्च/गुंतवणूक केलेली उर्वरीत देय्य रक्कमेवर देखील भांडवली अनुदान वितरीत करण्यात येईल.

**२) दुसरा** हप्ता वितरीत करतांना वस्त्रोद्योग प्रकल्प एन.पी.ए. मध्ये नसल्याबाबत संबंधीत वित्तीय संस्थेचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**५. नवीन वस्त्रोद्योग प्रकल्पांसाठी भांडवली अनुदान मंजूरीची कार्यपध्दती:-**

१) प्रस्तुत योजनेखाली भांडवली अनुदानासाठी वस्त्रोद्योग प्रकल्पाने विभागाच्या www.mahatextile.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रोत्साहन आवेदन अर्ज (Incentive Application Form) भरुन ऑनलाईन अर्ज सादर करावा.

२) वस्त्रोद्योग प्रकल्पाने भांडवली अनुदानाची मागणी करण्यासाठी प्रकल्प उत्पादनात आल्याच्या दिनांकापासून १२ महिन्यानंतर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा.

३) भांडवली अनुदानाची मागणीसाठी अर्ज करणाऱ्या वस्त्रोद्योग प्रकल्पाने ऑनलाईन अर्जामध्ये खालील प्रमाणपत्रे अपलोड करावीत.

- विस्तृत प्रकल्प अहवाल (डीपीआर) ची प्रत.
- प्रकल्पाचे नोंदणी प्रमाणपत्र.
- बँक/वित्तीय संस्थांकडून मुदती कर्ज मंजूरीचे पत्र.
- बँक/वित्तीय संस्थेकडून मूल्यांकन अहवाल. (Appraisal Report).
- संबंधित यंत्रणेकडून जागा वापरण्याची परवानगी मिळाल्याचे प्रमाणपत्र (भाडेकरारावर प्रकल्प असल्यास भाडे करारपत्र).
- प्रकल्पाची यंत्रसामग्री प्रकल्प स्थळी पोहचल्याचा पुरावा दर्शविणारे पोच (Delivery Challan) तसेच यंत्रसामुग्री योग्य रित्या कार्यरत असल्याबाबत स्व-घोषणापत्र.
- प्रकल्पाच्या यंत्रसामग्रीची रक्कम अदा केल्याचे सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र.
- वस्तु व सेवाकर (GST) प्रमाणपत्र.
- प्रकल्पाचे उत्पादन सुरु झाले असल्याचे घटकाचे स्व-घोषणापत्र (Self- Declaration).
- प्रकल्पाची मागील तीन महिन्याची विद्युत देयके. (प्रकल्प भाडेकरारावर असल्यास भाडे करारासहीत मूळ मालकाच्या नावावर प्रकल्पासाठी असलेले विद्युत देयके ).
- कच्चा माल खरेदी केल्याचे पहिले देयके (First Raw material Purchased Bill).
- प्रकल्पात उत्पादीत झालेल्या उत्पादनाचे पहिले विक्री देयके (First Sales Bill).
- DIC/सूक्ष्म, लघू व मध्यम प्रकल्पाचे प्रमाणपत्र (उद्योग आधार कडून) उद्योजक कराराची प्रत.
- घटक एनपीए/ब्लॅकलिस्टेड/लिक्विडेशन अंतर्गत नसल्याबाबतचे कंपनीच्या लेटरहेडवर स्व-घोषणा पत्र.
- २५ वर्षे किंवा त्याहून अधिक कालावधीसाठी (किंवा ५ वर्षे नूतनीकरणाच्या तरतुदीसह) भाडे/लीज करार/जमीन ताबा पत्र.
- विद्युत पुरवठा मंजुरीचे पत्र.
- गुंतवणुकीसाठी केलेल्या देयकाच्या पावत्या/बिले/व्हाउचर, इ.च्या प्रती.
- व्यक्तींच्या (महिला/एससी/एसटी/अल्पसंख्याक/माजी सैनिक) रोजगाराच्या संदर्भात वस्त्रोद्योग प्रकल्पाच्या संचालक मंडळापैकी किमान ३०% व्यक्तींचा समावेश असल्याचे प्रमाणपत्र.
- अतिरिक्त भांडवली अनुदानाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या वस्त्रोद्योग प्रकल्पाच्या बाबतीत खालील कागदपत्रे अनिवार्य असतील-

- महिलांद्वारे चालवल्या जाणाऱ्या वस्त्रोद्योग प्रकल्पांस अतिरिक्त ५% भांडवली अनुदान मिळवण्यासाठी वस्त्रोद्योग प्रकल्पाच्या लेटरहेडवरील महिला कर्मचाऱ्यांची यादी तसेच पाळणाघर सुविधेचा तपशील.
- अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती/अल्पसंख्याक असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले प्रमाणपत्र. माजी सैनिकांच्या वस्त्रोद्योग प्रकल्पांसाठी अतिरिक्त ५% भांडवली सबसिडी मिळविण्यासाठी माजी सैनिक कार्डची प्रत तसेच प्रकल्पाच्या संचालक मंडळापैकी किमान ३०% व्यक्ती माजी सैनिकांचा समावेश असल्याचे प्रमाणपत्र.

**६. वस्त्रोद्योग धोरणांतर्गत भांडवली अनुदानाच्या मंजुरीची प्रक्रिया-**

i. सुक्ष्म, लघू व मध्यम प्रकल्प, मोठे प्रकल्प आणि विशाल वस्त्रोद्योग प्रकल्पांनी भांडवली अनुदान मंजूरीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

ii. परिपूर्ण भरलेले भांडवली अनुदानासाठीचे फॉर्म प्राप्त झाल्यानंतर तपशीलवार प्रकल्प अहवालासह प्रत्येक सुक्ष्म, लघू व मध्यम प्रकल्प, मोठे आणि विशाल वस्त्रोद्योग प्रस्तावांची छाननी आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर करतील. तसेच आवश्यकता भासल्यास आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांच्या निर्देशावरून प्रादेशिक उपायुक्त, वस्त्रोद्योग यांच्याकडून विचाराधीन वस्त्रोद्योग प्रकल्पांची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येईल.

iii. प्राप्त झालेल्या ऑनलाईन प्रस्तावांची तपासणी करून आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी त्यांच्या शिफारशीसह सदर प्रस्ताव शासनास सादर करावेत.

iv. ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जामध्ये पात्र रकमेनुसार अनुदानाची मागणी करण्यात आली आहे किंवा कसे याबाबतची तपासणी आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर करतील. सदर तपासणी केल्यानंतर रक्कम योग्य असल्यास तसे प्रमाणित करून सदर प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईन प्रस्ताव प्राप्त झालेल्या क्रमानुसार (First come first out) आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर शासनास सादर करतील तसेच सदर प्रस्तावात काही त्रुटी असल्यास त्या त्रुटीच्या कारणांसह आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर संबंधित वस्त्रोद्योग प्रकल्पांस ऑनलाईन पध्दतीने परत करतील.

v. आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांच्याकडून शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावावर शासनस्तरावर ऑनलाईन तपासणी करून प्रस्ताव अ.मु.स./प्र.स./सचिव (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मान्यतेसाठी सादर केला जाईल. तसेच प्रस्तावात काही त्रुटी असल्यास प्रकरणपरत्वे आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांचेकडून त्रुटीची पुर्तता करून घेऊन प्रस्ताव उक्त समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

vi. अल्ट्रा मेगा (अतिविशाल) वस्त्रोद्योग प्रकल्पांनी सदर धोरणांतर्गत अनुदान मंजुरीसाठी दाखल केलेले अर्ज थेट अ.मु.स./प्र.स./सचिव (वस्त्रोद्योग) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सादर केले जातील आणि अनुदान मंजुरीसाठी मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठित उद्योग विभागाच्या उच्चाधिकार समितीव्दारे (HPC) विशेष पॅकेज अंतर्गत अनुदानांना मान्यता दिली जाईल.

vii. आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांच्याकडून पडताळणी होऊन प्राप्त झालेल्या प्रस्तावास खालील समिती भांडवली अनुदान मंजूर करेल. सदर समितीमध्ये खालील अधिकाऱ्यांचा समावेश असेल:-

१) अ.मु.स./प्र.स./सचिव (वस्त्रोद्योग) — अध्यक्ष

| | |
|---|---|
| २) अ.मु.स./प्र.स./सचिव (नियोजन) | सदस्य |
| ३) अ.मु.स./प्र.स./सचिव (वित्त) | सदस्य |
| ४) अ.मु.स./प्र.स./सचिव (ऊर्जा) | सदस्य |
| ५) आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर | सदस्य |
| ६) सह/उप सचिव (टेक्स-५) | सदस्य सचिव |

सदर समितीची बैठक प्रत्येक महिन्याला किंवा आवश्यकतेनुसार आयोजित करून भांडवली अनुदानासाठी शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर योग्य तो निर्णय घेईल. समितीच्या निर्णयानुसार वस्त्रोद्योग विभाग शासन मान्यतेने अनुदान वितरणाचे आदेश निर्गमित करेल.

**७.** एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अन्वये, राज्यातील वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली अनुदान या योजनेसाठी निधीची अर्थसंकल्पीय तरतूद खालील नमुद केलेल्या लेखाशिर्षाखाली करून त्यातून सदर योजनेवरील खर्च भागविण्यात येईल.

"मागणी क्रमांक व्ही-२
२८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग,
(११०), संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था,
(०३) एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८,
(०३)(०६) एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत भांडवली
अनुदान योजना २०२३-२८,
(२८५१ ७४५४) ३३, अर्थसहाय्य."

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०८२८१२१५२६१५०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात आला आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

SHRIKRISHNA BABURAO PAWAR

Digitally signed by SHRIKRISHNA BABURAO PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=631cf5e4544a7032340c686106b15138df3ef3b889e86fb2026c1add12d27e41, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2FAFF40BB05D156355556F7264A3A59AD12DD42F183422309976C41CE28C0A1D, cn=SHRIKRISHNA BABURAO PAWAR
Date: 2024.08.28 12:32:22 +05'30'

**( श्रीकृष्ण पवार )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन,मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (गृह, विधी व न्याय) महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (सर्व) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन,मुंबई.

UNCOMPLICATE Simplifying compliance

७. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन,मुंबई.
८. मा.खासदार (सर्व) महाराष्ट्र राज्य.
९. मा.आमदार (सर्व) महाराष्ट्र राज्य.
१०. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२. सचिव (वस्त्रोद्योग ) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर.
१४. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर.
१५. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर.
१६. संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, नागपूर.
१७. अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई.
१८.महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ, मुंबई.
१९. वस्त्रोद्योग विभागातील सर्व कार्यासने.
२०.निवड नस्ती (कार्यासन टेक्स-५).

UNCOMPLYCATE Simplifying Compliance

**शासन निर्णय क्र. धोरण-२०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५, दि.२८ ऑगस्ट, २०२४ सोबतचे सहपत्रे.**

## परिशिष्ट "अ" - जिल्ह्यांचे झोननिहाय वर्गीकरण

| अ.क्र. | झोन | जिल्हे |
|---|---|---|
| १. | झोन १ | अकोला |
| २. | | अमरावती |
| ३. | | बुलढाणा |
| ४. | | यवतमाळ |
| ५. | | वाशीम |
| ६. | | भंडारा |
| ७. | | चंद्रपूर |
| ८. | | गडचिरोली |
| ९. | | गोंदिया |
| १०. | | नागपूर |
| ११. | | वर्धा |
| १२. | झोन २ | छत्रपती संभाजीनगर |
| १३. | | जालना |
| १४. | | बीड |
| १५. | | लातूर |
| १६. | | धाराशिव |
| १७. | | नांदेड |
| १८. | | हिंगोली |
| १९. | | परभणी |
| २०. | | धुळे |
| २१. | | जळगाव |
| २२. | | नंदूरबार |
| २३. | झोन ३ | नाशिक |
| २४. | | अहमदनगर |
| २५. | झोन ४ | मुंबई शहर |
| २६. | | मुंबई उपनगर |
| २७. | | रायगड |
| २८. | | रत्नागिरी |
| २९. | | सिंधुदुर्ग |
| ३०. | | ठाणे |
| ३१. | | पालघर |
| ३२. | | पुणे |
| ३३. | | कोल्हापूर |
| ३४. | | सांगली |
| ३५. | | सातारा |
| ३६. | | सोलापूर |

UNCOMPLICATE Simplifying Compliance

# परिशिष्ट “ब”

## Sign Up Form

| | | |
|---|---|---|
| **Details of Applicant** | | |
| 1 | Name of the Applicant (Authorized person of the enterprise / unit) | |
| 2 | Designation | |
| 3 | Mobile Number | |
| 4 | Email ID | |
| **Details of Enterprise/Unit** | | |
| 5 | Name of the Enterprise/ Unit | |
| 6 | Address (Registered office of Enterprise / Unit): | |
| 7 | Telephone Number | |
| 8 | Email ID | |
| 9 | Website | |
| 10 | Entity PAN Number | |
| 11 | Entity GST Number | |
| 12 | Registered Address of Entity | |
| | Address line 1 | |
| | Address line 2 | |
| | Pin Code | |
| | City/District | |
| | State | |
| 13 | Password | |
| 14 | Confirm Password | |

UNCOMPLYCATE Simplifying compliance

# परिशिष्ट “क”

## Business Application Form

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Details of Applicant** | | | | |
| 1 | Name of the Applicant (Authorized person of the unit) | | | |
| 2 | Designation | | | |
| 3 | Mobile Number | | | |
| 4 | Email ID | | | |
| **Details of Unit** | | | | |
| 5 | Name of the Unit (As per Certificate of Incorporation / Registration) | | | |
| 6 | Valid Maharashtra Industry Department Approval Number | | | |
| 7 | Maharashtra Pollution Control Board (PCB) | | | |
| | Consent to Establish | | | |
| | Consent to Operate | | | |
| 8 | Type of Constitution | | | |
| 9 | If selected Proprietary/OPC | Name of Sole Proprietor + Nomination | | |
| | | Gender | | Male/Female/Transgender |
| | | Whether belongs to SC/ST/ Minority / Ex-Serviceman | | Yes / No |
| 10 | If selected Partnership / Joint Venture/LLP | Number of Partners | | |
| | | Gender | Male | |
| | | | Female | |
| | | | Transgender | |
| | | SC | | |
| | | ST | | |
| | | Ex-serviceman | | |
| | | Minority | | |
| 11 | If selected Limited Companies (private, public) | Number of Directors including MD | | |
| | | Gender | Male | |
| | | | Female | |
| | | | Transgender | |
| | | SC | | |
| | | ST | | |
| | | Ex-serviceman | | |
| | | Minority | | |
| 12 | If selected Cooperative | Number of Members | | |
| | | Gender | Male | |
| | | | Female | |
| | | | Transgender | |
| | | SC | | |
| | | ST | | |
| | | Ex-serviceman | | |
| | | Minority | | |
| 13 | Corporate Identity Number | | | |

UNCOMPLYCATE
Simplifying compliance

| | | | |
|---|---|---|---|
| | (CIN) / LLP Identity Number (LLPIN) /Registration Number | | |
| 14 | Date of Incorporation/ Registration of the Unit | | |
| 15 | Unit/Entity PAN Number | | |
| 16 | Unit/Entity GST Number | | |
| 17 | IEM/UAM/URC (As applicable)<br>Number<br>Date | | |
| 18 | Unit Location Details | | |
| | Address line 1 | | |
| | Address line 2 | | |
| | State | | |
| | District | | |
| | Taluka | | |
| | Village | | |
| | Pin Code | | |
| 19 | Textile Zone | | |
| 20 | Segment of Textile Unit | Spinning / Weaving / Garmenting / Technical Textiles / Composite /……… | |
| 21 | Sub-segment of Textile Unit | Spinning / Weaving / Garmenting / Technical Textiles / ……… | |
| 22 | Nature of Textile Unit | New Project / Existing Project | |
| | | (If existing) Expansion Project /Modernization project /Diversification Project | |
| | | **Details of Investment** | |
| 23 | Whether Land is in MIDC Area? | Yes / No | |
| 24 | Land Area (in sq.m.) | | |
| 25 | Land Value (INR in lakhs) | Rs. --------- | |
| 26 | Building Value (INR in lakhs) | Rs. --------- | |
| 27 | Investment in Plant & Machinery Investment - Fixed Capital Investment (INR in lakhs) | Rs. --------- | |
| 28 | Investment in ETP (INR in lakhs) | Rs. --------- | |
| 29 | Investment in ZLD (including construction cost) (INR in lakhs) | Rs. --------- | |
| 30 | Investment in Solar Plant (INR in lakhs) | Rs. --------- | |
| 31 | Investment in Steam Generation Plant (INR in lakhs) | Rs. --------- | |
| 32 | Total Project Cost (INR in lakhs) | Rs. --------- | |
| 33 | Category of Textile Unit | MSME / Large / Mega / Ultra Mega – auto-selected based on FCI | |
| | | **Financial Details** | |
| 34 | Nature of Financing | Self-Finance / Bank Finance / Both | |
| 35 | If selected Bank Finance | Total Loan sanctioned by Bank (INR in lakhs) | |
| | | Bank Loan amount used for FCI (INR in lakhs) | |
| | | Term Loan Account Number | |

UNICOMPLYCATE
Simplifying Compliance

| | | | |
|---|---|---|---|
| | | Date of Sanction of Term Loan | Date |
| | | Name of the Bank | |
| | | Branch of the Bank | |
| | | Bank Address | |
| | | Moratorium Period *(Date Format from: DD/MM/YYYY to DD/MM/YYYY)* | From to To-date (2 date-pickers) |
| | | Repayment Start date from | Date |
| 36 | If selected Self Finance | Total Self Finance Amount (INR in lakhs) | |
| | | Self- finance amount used for FCI (INR in lakhs) | |
| 37 | If selected Both | **Bank and Self-Finance Investment** | |
| | | Total Bank and Self Finance Investment (INR in lakhs) | |
| | | **Self-Finance Investment** | |
| | | Total Self Finance Amount (INR in lakhs) | Rs. -------- |
| | | Self- finance amount used for FCI (INR in lakhs) | |
| | | **Bank-Finance Investment** | |
| | | Total Loan sanctioned by Bank (INR in lakhs) | Rs. --------- |
| | | Bank Loan amount used for FCI (INR in lakhs) | |
| | | Term Loan Account Number | |
| | | Date of Sanction of Term Loan | Date |
| | | Name of the Bank | |
| | | Branch of the Bank | |
| | | Bank Address | |
| | | Moratorium Period *(Date Format from: DD/MM/YYYY to DD/MM/YYYY)* | From to To-date (2 date-pickers) |
| | | Repayment Start date from | Date picker |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Details of Production and Employment** | | | | |
| 38 | Date of Commencement of Commercial Production | | Date picker | |
| 39 | Monthly Sale (in units) | | [______] Kgs/Pieces/Meters/Ton/...../ | |
| 40 | Monthly Sales (INR in lakhs) | | Rs. ---------- | |
| 41 | Whether Unit is 100% Export oriented? | | Yes / No | |
| 42 | Annual Turnover of previous financial year (INR in lakhs) | | Rs. ---------- | |
| 43 | Export during 1st year (INR in lakhs) | | Rs. ---------- | |
| 44 | Employment | Male | Female | Transgender |
| | Direct Employment | | | |
| | Indirect Employment | | | |
| | Total Employment | | | |
| **Details of Power Consumption** | | | | |
| 45 | Name of Supplier | | | |
| | Consumer Number | | | |
| | Supply at HT / LT mentioned in electric bill | | HT / LT | |
| | Load Sanctioned (in KVA) | | | |
| 46 | Billing History for last 6 months | | | |

| | Bill Month | Units | Bill Amount |
|---|---|---|---|
| | Month 1 (latest) | | |
| | 2 | | |
| | 3 | | |
| | 4 | | |
| | 5 | | |
| | 6 | | |

**Details of Plant and Machinery**

| | |
|---|---|
| 47 | Details of Machinery |

| | | | |
|---|---|---|---|
| Machine Name | | Model No. | |
| Make of Machine | | Purchase Invoice Number | |
| Date of Purchase | | Date of Installation | |
| Capacity Per Day | | Serial Number | |
| Total cost of the Machines | | | |

UNCOMPLYCATE
Simplifying Compliance

**List of Document**

| | | |
|---|---|---|
| 1 | PAN of Company | |
| 2 | GST Registration Certification | |
| 3 | Certificate (IEM/UAM/URC) | |
| 4 | IEM Part-B with Copy of Memorandum | |
| 5 | Constitution Documents<br>Partnership: Deed of Partnership, Registration Certificate or Acknowledgement<br>Company: MoA , AoA, Registration Certificate<br>Cooperative: Registration certificate, Copy of bye-laws<br>Proprietor: Registration certificate | |
| 6 | SC/ST/Ex-serviceman/Minority Certificate (if applicable) | |
| 7 | Maharashtra Pollution Control Board (MPCB) Certificate<br>a. Consent to Establish<br>b. Consent to Operate | |
| 8 | Industry Development Authority Number Certificate | |
| 9 | Land Documents<br>MIDC Land: Plot possession letter, agreement of lease etc.<br>Private Land: a) Sale Deed<br>b) Lease deed/agreement.<br>c) 7/12 extract<br>d) NA permission for industrial use / copy of application filed under section 44A of Maharashtra Land Revenue Code in schedule 6A where Regional Development Plan or Draft Regional Development Plan does not exist, with the concerned Revenue authority / Zone confirmation certificate from Competent Authority | |
| 10 | Building Plan approval from competent Authority | |
| 11 | Power Sanction Letter | |
| 12 | Power Bill Copy (Electricity) last 6 months | |
| 13 | ELP-I in the Prescribed Format (employment local person) | |
| 14 | PF Challan Before & After Expansion | |
| 15 | Project Registration Certificate | |
| 16 | Detailed Project Report (DPR) | |
| 17 | Project Appraisal Report from Financial Institution / SICOM (for self-finance) | |
| 18 | Authorization for signing of application, execution of agreements etc.- Board Resolution – Company Letterhead | |
| 19 | Self-declaration of the entity that the production of the project has started. | |
| 20 | Loan Sanction Letter from Financial Institute / Bank | |
| 21 | A copy of their report if the bank inspects the project, otherwise the bank's explanation | |
| 22 | First Raw Material Purchased Bill | |
| 23 | First Sales Bill of the product produced in the project | |
| 24 | Chartered Accountant's Certificate of Payment for Project Machinery | |
| 25 | Receipt Delivery Challan showing the proof of the project machinery reaching the project site | |
| 26 | Chartered Accountant's Certificate of Payment for Project Accessories | |
| 27 | Receipt Delivery Challan showing the proof of the project accessories reaching the project site | |
| 28 | SASMIRA certificate for ETP/CETP/ZLD. | |
| 29 | MEDA approved DPR of Solar Plant | |
| 30 | Technical Sanction letter of MEDA for Solar Plant | |
| 31 | Any other document requested by Textiles Department | |